DISTRICT AND SESSIONS COURT, SATARA.
INWARD NO. 8268
DATE - 18/04/2026
03.00pm
REGISTRAR

जावक क्र. १९५९/२०२६
दिवाणी न्यायालय व.स्तर, कराड
दिनांक १८/०४/२०२६

**संदर्भ -** १. दिवाणी न्यायालय व.स्तर, कराड यांचेकडील जा.क्र. १३४५/२०२६ दिनांक २७/०३/२०२६.
२. मा. जिल्हा न्यायालय, सातारा कडील जा.क्र. प्रशा/ झेरॉक्स /२०२६/२८११ दिनांक ०६/०४/२०२६.

---

# निविदा

मा. दिवाणी न्यायालय व. स्तर, कराड या कार्यालयाचे आस्थापनेवरील कार्यालयीन व न्यायालयीन कामकाजातील नक्कलाकामी आवश्यक असणाऱ्या झेरॉक्स या बाह्ययंत्रणेद्वारे कार्यरत झेरॉक्स कंत्राटदारामार्फत (Outsourcing) द्वारे सुरु आहे. झेराक्स कंत्राटदाराची मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी ठरवून दिलेल्या विहीत नमुन्यातील वार्षिक कराराची मुदत दिनांक ३१/०३/२०२६ रोजी संपुष्टात आली आहे.

त्यास अनुसरुन या कार्यालयाकडून उपरोक्त संदर्भ क्रं. १ अन्वये मा. जिल्हा न्यायालय, सातारा यांचेकडे कळविणेत आले आहेत. त्या पत्रास अनुसरुन मा. जिल्हा न्यायालय, सातारा यांचेकडील पत्र जा.क्र. प्रशा./झेरॉक्स/२०२६/२८१०, दि. ०६/०४/२०२६ अन्वये निविदा प्रक्रिया राबवून इच्छुक कंत्राटदाराकडून प्राप्त होणाऱ्या अर्जानुसार तुलनात्मक तक्त्यासह मंजूरीसाठी मा. जिल्हा न्यायालय, सातारा यांचेकडे प्रस्ताव पाठविणेस निर्देशित केले आहे.

सदर निर्देशांप्रमाणे या कार्यालयाकडून याद्वारे जाहिर निविदा प्रसिद्ध करणेत येते की, मा. उच्च न्यायालय यांचेकडून प्राप्त होणाऱ्या निर्देशाबर हुकूम बाह्ययंत्रणेद्वारे कार्यरत झेरॉक्स कंत्राटदारामार्फत (Outsourcing)झेरॉक्स पुरविणेची सेवा देणेस इच्छूक पुरवठादार संस्था अगर व्यक्ती यांना या निविदा सुचनेद्वारे निर्देशित करणेत येते की, त्यांनी या कार्यालयास सेवा पुरवठ्याचे प्रतिनग सविस्तर दरपत्रक (GST सह) **दिनांक ०२/०५/२०२६ रोजी सायंकाळी ०५:०० वाजेपर्यंत** सादर करावे.

Seen
PDJ
18/04/2026

सेवापुरवठादार यांना मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील विहीत नमुन्याप्रमाणे वार्षिक करारपत्र करुन देणे बंधनकारक राहील.

सिलबंद निविदेवर आपल्या फर्मचे नाव, सविस्तर पत्ता व संपर्क क्रमांक याचा स्पष्ट उल्लेख असणे आवश्यक आहे.

निविदा स्वीकारणेचा, नाकारणेचा अथवा स्थगित ठेवण्याचे अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश साहेब, सातारा अथवा त्यांनी प्राधिकृत केलेले कार्यालय प्रमुख यांना राहील, याची नोंद घेणेची आहे.

18/04/26.

दिवाणी न्यायाधीश व. स्तर, कराड.

**प्रत-** १. मा. जिल्हा न्यायालय, सातारा यांचे संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी सविनय सादर.

२. अतिरिक्त जिल्हा न्यायालय, दिवाणी न्यायालय व.स्तर, दिवाणी न्यायालय क. स्तर, कराड यांचेकडील नोटीस बोर्डावर प्रसिद्धीसाठी.

३. नगरपरिषद कार्यालय, कराड

४. तहसिल कार्यालय, कराड

५. पंचायत समिती कार्यालय, कराड

जा.क्र. १०५८

दिनांक १८/४/२६